॥ गीतारहस्य प्रस्तावना ॥

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक (१८५३ - १९२०)

पुण्यतिथीनिमित्ताने स्मरण

बाळ गंगाधर टिळकलिखित श्रीमद्भगवद्गीतारहस्य अथवा कर्मयोगशास्त्र ॥ अथ समर्पणम् ॥

श्रीगीतार्थः क्व गम्भीरः व्याख्यातः कविभिः पुरा । आचार्यैर्यश्च बहुधा क्व मेऽल्पविषया मतिः ॥ तथापि चापलादस्मि वक्तुं तं पुनरुद्यतः । शास्त्रार्थान् सम्मुखीकृत्य प्रत्नान् नव्यैः सहिचितैः ॥ तमार्याः श्रोतुमर्हन्ति कार्याकार्यदिदृक्षवः । एवं विज्ञाप्य सुजनान् कालिदासाक्षरैः प्रियैः ॥ बालो गांगाधरिश्चाऽहं तिलकान्वयजो द्विजः । महाराष्ट्रे पुण्यपुरे वसन् शाण्डिल्यगोत्रभृत् ॥ शाके मुन्यग्निवसुभूसम्मिते शालिवाहने । अनुसृत्य सतां मार्गं स्मरंश्चापि वचो ॥ यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् । यत्तपस्यसि कौन्तेय तत्कुरुष्व मदर्पणम् ॥ गीता ९.२७ हरेः ॥

समर्पये ग्रंथमिमं श्रीशाय जनतात्मने । अनेन प्रीयतां देवो भगवान् पुरुषः परः ॥

बाळ गंगाधर टिळकलिखित श्रीमद्भगवद्गीतारहस्य मराठी प्रस्तावनेतील काही भाग

प्रस्तावना

संतांची उच्छिष्टे बोलतो उत्तरे । काय म्यां पामरे जाणावे हे ॥

श्रीमद्भगवद्गीतेवर अनेक संस्कृत भाष्ये, टीका किंवा प्राकृत भाषांतरे अगर विस्तृत सर्वमान्य निरूपणे असता, हा ग्रंथ प्रसिद्ध करण्याचे कारण काय हे जरी ग्रंथारंभीच सांगीतले आहे, तरी ग्रंथामधील प्रतिपाद्य विषयाच्या विवेचनात सांगता न येणार्या काही गोष्टींचा खुलासा करण्यास प्रस्तावनेखेरीज दुसरा मार्ग नाही. पैकी पहिली गोष्ट स्वतः ग्रंथकारासंबंधी होय. भगवद्गीतेचा व आमचा प्रथम परिचय होऊन आज सुमारे त्रेचाळीस वर्षे झाली. इसवी सन १८७२ साली वडील शेवटच्या दुखण्याने आजारी असता भगवद्गीतेवरील भाषाविवृत्ति नावाची प्राकृत टीका त्यांस वाचून दाखविण्याचे काम आमचेकडे आले होते. तेंव्हा म्हणजे आमच्या वयाच्या सोळाव्या वर्षी गीतेचा भावार्थ पूर्णपणे लक्षात येणे शक्य नव्हते. तथापि लहान वयात मनावर घडणारे संस्कार टिकाऊ असल्यामुळे भगवद्गीतेबद्दल तेव्हा उत्पन्न झालेली आवड कायम राहून संस्कृतचा व इंग्रजीचा पुढे अधिक अभ्यास झाल्यावर गीतेवरील संस्कृत भाष्ये व दुसर्या टीका आणि इंग्रजीत व मराठीत अनेक पंडितांनी केलेली विवेचनेहि वेळोवेळी वाचण्यात आली. परंतु स्वकीयांबरोबर युद्ध करणे हे मोठे कुकर्म म्हणून खिन्न झालेल्या अर्जुनास त्याच युद्धास प्रवृत्त करण्यासाठी सांगितलेल्या गीतेत ब्रह्मज्ञानाने किंवा भक्तीने मोक्ष कसा मिळवावा याचे, म्हणजे नुसत्या मोक्षमार्गाचे विवेचन कशाला, ही शंका मनात येऊन तीच उत्तरोत्तर बळावत चालली. कारण, गीतेवरील कोणत्याहि टीकेत त्याचे योग्य उत्तर आढळून येईना. आमच्याप्रमाणे दुसर्यांना हीच शंका आली असेल, नाही असे नाही. पण टीकातच गुंतून राहिले म्हणजे, टीकाकारांनी दिलेले उत्तर समाधानकारक न वाटले तरी त्याखेरीज दुसरे उत्तर सुचत नाहीसे होते. म्हणून सर्व टीका व भाष्ये बाजूला ठेवीन

नुसत्या गीतेचीच स्वतंत्र विचारपूर्वक आम्ही अनेक पारायणे केली. तेव्हा टिकाकारांच्या छापेतून सुटका होऊन मूळ गीता निवृत्तिपर नसून कर्मयोगपर आहे, किंबहुना गीतेत " योग" हा एकेरी शब्दच " कर्मयोग" या अर्थी योजिलेला आहे, असा बोध झाला.

सांसारिक कर्मे गौण किंवा त्याज्य ठरवून ब्रह्मज्ञान, भक्ति, वगैरे नुसत्या निवृत्तिपर मोक्षमार्गाचेच गीतेत निरूपण केलेले आहे, हे मत जरी आम्हास मान्यनाही, तरी मोक्षप्राप्तीच्या मार्गाचे भगवद्गीतेत मुदलीच विवेचन नाही, असेही आमचे म्हणणे नाही, हे आरंभीच सांगणे जरूर आहे. किंबहुना प्रत्येक मनुष्याने शुद्ध परमेश्वरस्वरूपाचे ज्ञान संपादन करून तद्द्वारा आपली बुद्धि होईल तितकी निर्मल व पवित्र करणे, हे गीताशास्त्राप्रमाणे त्याचे जगातील पहिले कर्तव्य होय, असे आम्हीही या ग्रंथात स्पष्ट दाखविले आहे; परंतु हा गीतेतील मुख्य मुद्दा नव्हे. युद्ध करणे हा क्षत्रियाचा धर्म असला तरी उलटपक्षी कुलक्षयादि घोर पातके घडून जे युद्ध मोक्षप्राप्तिरूप आत्मकल्याण्याचा नाश करणार ते करावे का करू नये, अशा कर्तव्यमोहात युद्धारंभी अर्जुन पडला होता. म्हणून तो मोह घालविण्यासाठी शुद्ध वेदांतशास्त्राधारे कर्माकर्माचे व त्याबरोबर मोक्षोपायाचे पूर्ण विवेचन करून, आणि कर्मे कधीच सुटत नाहीत व सोडूहि नयेत असे ठरवून, ज्या युक्तीने कर्मे केली म्हणजे कोणतेच पाप न लागता अखेर त्यानेच मोक्षहि मिळतो, त्या युक्तीचे म्हणजे ज्ञानमूलक व भक्तिप्रधान कर्मयोगाचेच गीतेत प्रतिपादन आहे, असा आमचा अभिप्राय आहे.

गीता ग्रंथ याप्रमाणे प्राधान्ये करून कर्मयोगाचा आहे म्हणूनच " ब्रह्मविद्यांतर्गत (कर्म) योगशास्त्र" या नावाने सर्व वैदिक ग्रंथात त्याला अग्रस्थान प्राप्त झाले आहे. " गीता सुगीता कर्तव्या किमन्यैः शास्त्र विस्तरैः" -- एकल्या गीतेचे पुरे अध्ययन केले म्हणजे बस्स आहे; बाकीचा फोलकट पसारा काय करावयाचा? असे म्हणतात ते खोटे नाही; म्हणूनच हिंदु धर्म व नीतिशास्त्र यांच्या मूळ तत्त्वांची ज्यास ओळख करून घ्यावयाची असेल त्यांनी या अपुर्व ग्रंथाचे प्रथम अध्ययन करावे असे आमचे तुयास सविनय, पण आग्रहपूर्वक सांगणे आहे.

प्राचीन टीकाकारांनी प्रतिपादिलेले गीतेचे तात्पर्य आणि आमच्या मताप्रमाणे गीतेचे रहस्य यात भेद का पडतो याची कारणे गीतारहस्यात सविस्तर सांगितली आहेत. परंतु गीतातात्पर्यासंबंधाने जरी याप्रमाणे मतभेद असला तरी गीतेवर जी अनेक भाष्ये व टीका आहेत, किंवा पूर्वी अगर अलिकडे गीतेची प्राकृतात जी भाषांतरे झाली आहेत त्यांचे प्रस्तुत ग्रंथ लिहिताना इतर बाबतीत नेहमीच प्रसंगानुसार थोडेबहुत साहाय्य झालेले असल्यामुळे त्या सर्वांचे आम्ही अत्यंत ऋणी आहोत, हे येथे सांगणे अवश्य आहे. आणि तसेच ज्या पाश्चिमात्य पंडितांच्या ग्रंथातील सिद्धांतांचा जागोजाग उल्लेख केलेला आहे त्यांचेहि अभार मानिले पहिजेत. किंबहुना या सर्व ग्रंथांच्या मदतीखेरीज प्रस्तुतचा ग्रंथ लिहिता आला असता की नाही याची वानवाच असल्याने, या प्रस्तावनेच्या आरंभी, " संतांची उच्छिष्टे बोलतो उत्तरे" हे तुकारामबुवांचे वाक्य आम्ही घातले आहे. सर्व काळी एकसारखेच लागू पडणारे म्हणजे त्रिकालाबाधित ज्ञान सांगणार्या गीतेसारख्या ग्रंथाने कालभेदानुरूप नवे नवे स्फुरण मनुष्याला प्राप्त व्हावे यात काही नवल नाही; कारण अश्या व्यापक ग्रंथाचा हा धर्मच असतो.

प्रस्तावना संपली. आता ज्या विषयाच्या विचारात आज पुष्कळ वर्षे घालविलि व ज्याच्या नित्य

सहवासाने व चिंतनाने मनाचे समाधान होऊन आनंद होत गेला, तो विषय ग्रंथरूपाने हातानिराळा होणार म्हणून वाईट वाटत असले तरी हे विचार - साधल्यास सव्याज, नाहीपेक्षा निदान जसेच्या तसे - पुढील पिढितील लोकांस देण्यासाठीच आम्हास प्राप्त झाले असल्यामुळे वैदिक धर्मांतील राजगुह्याचा हा परीस " उत्तिष्ठत! जाग्रत! प्राप्य वरान्निबोधित! " - उठा ! जागे व्हा! आणि(भगवंतांनी दिलेले) हे वर समजून घ्या ! - या कठोपनिषदातील मंत्राने (कठ. ३. १४) प्रेमोदकपूर्वक आम्ही होतकरू वाचकांच्या हवाली करितो. यातच कर्माकर्माचे सर्व बीज आहे; आणि या धर्माचे स्वल्पाचरणहि मोठ्या संकटातून सोडविते, असे खुद्द भगवंताचेच निश्चयपूर्वक आश्वासन आहे. यापेक्षा आणखी जास्त काय पाहिजे? " केल्याविण काही होत नाही" हा सृष्टीचा नियम लक्षात आणून तुम्ही मात्र निष्काम बुद्धीने कर्ते व्हा म्हणजे झाले. निव्वळ स्वार्थ - परायण - बुद्धीने संसार करून थकल्याभागल्या लोकांच्या कालक्रमणार्थ, किंवा संसार सोडून देण्याची तयारी म्हणूनहि, गीता सांगितलेली नसून संसारच मोक्षदृष्ट्या कसा केला पहिजे व मनुष्यमात्राचे संसारातले खरे कर्तव्य काय याचा तात्त्विकदृष्ट्या उपदेश करण्यासाठी गीताशास्त्राची प्रवृत्ति झालेली आहे. म्हणून पूर्ववयातच गृहस्थाश्रमाचे किंवा संसाराचे हे प्राचीन शास्त्र जितक्या लवकर समजून घेणे शक्य असेल तितक्या लवकर प्रत्येकाने समजून घेतल्याखेरीज राहू नये, एवढीच आमची शेवटी विनंती आहे.

पुणे बाळ गंगाधर टिळक

अधिक वैशाख शके १८३७